# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

झो. पु. प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दू. क्र.: (का.) : ०२०-६९०६७९००,६९०६७९१८
ईमेल- : srapune@yahoo.in वेबसाईट :www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां./२६८० /२०२५
दिनांक - १०/०८/२०२५

परिपत्रक क्र. १६/२०२५

विषय :- सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकरिता कालावधी निश्चित करणे बाबत

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली २०२२ मधील विनियम क्र.१४.६.२२(१)(A) नुसार व कार्यालयीन परिपत्रक ०६/२०२४ दि.०२/०९/२०२४ नुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेचा नोंदणीकरिता बांधकाम परवानगी अदा केल्यानंतर जास्तीत जास्त ६० दिवसाचा कालावधी निश्चित केला आहे. तसेच अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेला योजनेसंदर्भातील सर्व महत्वाच्या घटना व सांविधानिक मंजुरी यांचा तपशील वेळोवेळी कळविण्याबाबत सहकार विभागास सूचित करण्यात आले आहे.

विनियम क्र. १४.६.२२(१)(A) खालीलप्रमाणे आहे-

१. The eligible hutment dwellers, including the P.A.P.s nominated by the C.E.O.,S.R.A., will have to form a Co-operative Housing Society after all members have fully paid their dues to the Corporation, MHADA etc. All the cost involved in connection with registration of the Co-operative Housing Society will be borne by the eligible hutment dwellers and the Developer shall register a Co-operative Housing Society (C.H.S.) of the rehabilitated hutment dwellers within ६० days from the date of issuance of the commencement certificate to the project of Rehabilitation Tenements by the hutment dwellers.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस बांधकाम परवानगी अदा केल्यानंतर पात्रता यादीमध्ये बदल झाल्यास विकसकास सुधारित प्रशासकीय मान्यता व सुधारित बांधकाम परवानगी घ्यावी लागते.अपिलात व पुरवणी पात्रता यादीमध्ये पात्र होणाऱ्या झोपडीधारकांचा समावेश सहकारी गृहनिर्माण संस्थेत करणे आवश्यक असल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली २०२२ मधील विनियम क्र. १४.६.१५(७)(iii) नुसार योजनेस

भोगवटापोटीचा टीडीआर अदा करणेपूर्वी सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करणे व नोंदणी करणेबाबत तरतूद आहे.

विनियम क्र.१४.६.१५ (७) (iii) खालीलप्रमाणे आहे-

(iii) After issue of occupation certificate of rehabilitation building/s, and formation and registration of Co-operative Housing Society ३०% of total Slum T.D.R.permissible shall be released.

वरील प्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची बाब ३०% TDR मागणीपुर्वी करणेबाबत नमुद असुन विकसक इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करूनदेखील सोसायटी स्थापन करणेस विलंब करतात, त्याकारणास्तव झोपडीधारकांच्या हिताच्या इतर बाबी पुनर्वसनाच्या दृष्टीने प्रभावित होतात.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) योजनेस बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र अदा केल्यानंतर सहकार विभागाने संबंधित विकसकाकडे सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होण्याकरीता पाठपुरावा करावा.

२) विकास नियत्रंण नियमावली, २०२२ मधील विनियम १४.६.१५ (७) (ii) नुसार विकसकास टीडीआर अदा करावयाच्या दुसऱ्या टप्प्याच्या आधी म्हणजेच RCC & Brickwork पोटी ३५% TDR अदा करणेपूर्वी सहकार विभाग, झोपुप्रा कडून सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

तसेच सदर बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे यांचे निर्णय अंतिम राहतील.

वरील परिपत्रकातील निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

10/9/2024

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. सर्व विभाग प्रमुख,झो.पु.प्रा.
२. सर्व विकसक (झो.पु.नोंदणीकृत)